प्रकरण ४

# महात्मा जोतीबा फुले

महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्त्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतिकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भारावून जाऊन सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरुष होते. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होत. कारण ते सामान्यांतील असले तरी विचाराने व कर्तृत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरुद्ध जोतीबांनी बंड पुकारले. समतेसाठी त्यांनी शूद्रातिशूद्रांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. 'शिक्षण व समता' या दोन शब्दांत त्यांच्या कार्याचे यथोचित वर्णन करता येईल. ते नुसते बोलघेवडे सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते ऋषी होते. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांसाठी रात्रंदिवस झटणारे ते सेवक होते. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रमही हाती घेतले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रयोगप्रवण व विकसनशील होते. ग्रंथपांडित्यापेक्षा समाज प्रवाहातील भल्याबुऱ्या प्रवृत्तींचा अन्वयार्थ लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रत्येक बाबीच्या मुळाशी जाऊन चिंतनशीलपणे त्यावर ते विचार करीत असत. त्यामुळेच त्यांना **'महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर'** म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील समाज सुधारकांचे अग्रणी म्हणूनही त्यांना ओळखले जाते. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला त्यांनी वेगळी दिशा दाखविली. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उद्धारासाठी ते चंदनासारखे झिजले. त्यांच्या या कार्यात अनेकांनी विघ्ने आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी हालअपेष्टा सहन केल्या, तरीही ते आपल्या ध्येयापासून कधीच विचलित झाले नाहीत.

इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात स्थिर होऊ लागली. त्याचबरोबर सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तने होऊ लागली. शिक्षणाचा प्रसार होऊ लागला होता. परंतु तो ठरावीक वर्गापुरताच मर्यादित होता. समाजातील तोच वर्ग आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करू लागला होता. मात्र बहुजन समाज हा आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत मागासलेलाच राहिला. समाजात जातिभेदाच्या विकृत कल्पनेने काहूर मांडले होते. शिक्षणापासूनचे फायदे सामान्यांपर्यंत पोहोचले नव्हते. बहुजन समाज अंधकारात चाचपडत होता. जातीयवादाची पोलादी चौकट भक्कम होती. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या दुर्दैवी स्थितीत काहीच फरक पडला नाही. वेगवेगळ्या प्रकारचे पाश समाजाभोवती आवळले गेले होते. अशा काळात जोतीबा फुल्यांनी स्त्रीशिक्षण आणि अस्पृश्यांसाठी केलेले कार्य फार मोलाचे आहे. त्यांना 'स्त्रियांचा उद्धारकर्ता' म्हटले जाते. ते सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक होते. समाजपरिवर्तनासाठी जोतीबांनी सामाजिक

Scanned with ACE Scanner

प्रश्नांच्या मुळाशी जाऊन घाव घातला. सामाजिक चळवळीला सामाजिक वर्गविग्रहाचे स्वरूप प्राप्त होण्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. ते एक बंडखोर विचारांचे सुधारक होते. धार्मिक विषमतेविरुद्ध बंड करणारे व धार्मिक सहिष्णुतेच्या मूल्यांसाठी प्रयत्न करणारे ते थोर समाजसेवक होते.

## जीवन वृत्तांत

महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म इ. स. १८२७ मध्ये पुणे येथे झाला. फुले घराण्याचे मूळ सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होय. त्यांचे मूळ उपनाव गोऱ्हे असे होते. ते जातीने क्षत्रिय माळी होते. ते कटगुणचे चौगुले होते. बारा बलुतेदारांपैकी चौगुले हे एक होते. परंतु गावातील प्रस्थापितांबरोबर त्यांच्या पणजोबांचे भांडण झाले. त्यांनी ते गाव सोडले. त्यांनी पुरंदर तालुक्यातील खानवडी गावी स्थलांतर केले. तेथे त्यांनी चांगला जम बसविला. त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव शेटिबा असे ठेवण्यात आले. शेटिबा भोळसट व उधळे होते. तसेच त्यांना व्यसनही लागले होते. त्यांनी संपूर्ण इस्टेट उधळली. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची स्थिती वाईट झाली. परिणामी, शेटिबांना उदरनिर्वाहासाठी कुटुंबाचे स्थलांतर पुण्याला करावे लागले. त्यांना राणोजी, कृष्णा व गोविंदा अशी तीन मुले होती. घरच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे प्रारंभी या मुलांनी शेळ्या राखण्याचे काम केले. त्यांच्या धन्याने त्यांचा प्रामाणिकपणा, हुशारी व कष्टाळूपणा पाहून त्यांना फुलांचा व्यवसाय शिकविला. त्यांनी या व्यवसायात चांगलाच लौकिक कमावला. त्यामुळेच त्यांचे गोऱ्हे हे उपनाव मागे पडून फुले या नावाने ते ओळखले जाऊ लागले. पेशव्यांच्या कानावर त्यांची कीर्ती गेली. पेशव्यांनी त्यांना खाजगीत फुले घालण्याचे काम दिले. त्याचबरोबर ३५ एकर जमीन इनाम म्हणून दिली.

शेटिबांच्या मृत्यूनंतर राणोजीने आपल्या दोन बंधूंना बाजूला सारून इनाम जमीन स्वतःच्या नावे करून घेतली. त्यामुळे पुन्हा कृष्णा व गोविंदा यांना वाईट दिवस आले. त्यांनी पूर्वीप्रमाणेच चिकाटीने, सचोटीने आपला धंदा चालविला. भाजीपाला विक्रीचे दुकानही त्यांनी सुरू केले. गोविंदाचा चिमणाबाईशी विवाह झाला. त्यांच्या पोटीच जोतीबा व राजाराम यांचा जन्म झाला. जोती म्हणजे ज्योत. ज्योत दुसऱ्यास प्रकाश देते व स्वतः नाहीशी होते. त्याचप्रमाणे जोतीबांनी समाजसेवेत स्वतः झिजून संपूर्ण महाराष्ट्रात आपले नाव अजरामर केले.

जोतीबा फुले एक वर्षाचे असताना त्यांची आई मृत्यू पावली. ती अत्यंत धर्मनिष्ठ व देवपरायण होती. गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता मुलांचे संगोपन चांगले केले. जोतीबा हाडापेराने मजबूत, प्रकृतीने सुदृढ आणि रूपाने देखणे होते. गोविंदरावांना आपल्या मुलांना शिक्षण मिळावे असे वाटत होते. त्यामुळेच त्यांनी जोतीबाला ७ व्या वर्षी खाजगी पाठशाळेत घातले. तेथे संस्कृत, व्याकरण, ज्योतिष, वेदांत, धर्मशास्त्र इत्यादी शिक्षण दिले जाई. त्यावेळचे वातावरण विद्याभ्यासास पोषक नव्हते. शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटलेले नव्हते. गोविंदरावांचा इतरांनी बुद्धिभ्रम केला. परिणामी, जोतीबांना शाळेतून काढण्यात आले. शिक्षणात खंड पडला तरी जोतीबांची शिक्षणाची ओढ कमी झाली नाही. फावल्या वेळात ते

वाचन करीत असत. त्यांचे वय १३ असतानाच त्यांचा विवाह धनकवडीच्या झगडे-पाटील यांच्या सावित्रीबाई या कन्येशी झाला.

जोतीबांची चिंतनशीलता व बौद्धिक कौशल्य पाहून त्यांच्या शेजारी राहणारे उर्दू शिक्षक गफार बेग मुन्शी आणि धर्मोपदेशक लिजिट साहेब यांनी त्यांचे शिक्षण पुन्हा चालू करावे असा आग्रह गोविंदरावांकडे धरला. त्यांना त्यांनी मुलांच्या कर्तृत्वाला वाव मिळण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे हे पटवून दिले. गोविंदरावांनाही हे विचार पटले. त्यांनी पुन्हा जोतीबास शाळेत घालण्याचा निर्णय घेतला. इ. स. १८४१ मध्ये त्यांनी एका स्कॉटिश मिशनरी शाळेत जाण्यास सुरुवात केली. ते उत्साही, महत्त्वाकांक्षी व उद्योगी होते. दरम्यानच्या काळात त्यांची एका ब्राह्मण जमातीतील विद्यार्थ्यांबरोबर मैत्री जमली. मिशनऱ्यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे त्यांना समाजातील धर्माच्या नावाखाली चालत असलेल्या अनेक अनिष्ट प्रथांचा अर्थ कळू लागला. त्यांनी पाश्चात्त्य विचारवंतांच्या ग्रंथांचा अभ्यासही केला. त्यांनी आपल्या देशबांधवांच्या उद्धाराचा संकल्प सोडला. आपल्या देशबांधवांच्या मनावर अज्ञानाची, शैथिल्याची आणि बुरसटलेल्या विचारांची पकड बसली आहे, ती पकड विचारक्रांती घडवून दूर करण्याचा निर्धार केला. राजकीय व सामाजिक गुलामगिरीबद्दल त्यांना चीड होती. इंग्रजी राज्य उलथून टाकण्याच्या हेतूने लहुजीबुवा मांग या अस्पृश्य समाजातील व्यक्तीकडून दांडपट्टा, नेमबाजी वगैरेंचे शिक्षण घेतले. त्यांना आपल्या विचारातील फोलपणा कळून चुकला. पाच-पंचवीस तरुणांनी हुल्लडबाजी करून इंग्रजांचे राज्य नष्ट होण्याइतके ते लेचेपेचे नव्हते हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळेच ते लोकसेवा आणि शिक्षण या समाजसुधारणेच्या पायाशुद्ध मार्गाकडे वळले. त्यांचे मनोधैर्य विलक्षण होते. त्यांनी कधीच सदसद्विवेक बुद्धीशी प्रतारणा केली नाही. सामाजिक क्रांतीच्या ध्येयाने ते प्रेरित झाले होते.

समाजातील अघोरी कृत्याने त्यांचे मन होरपळून जात होते. आपल्या प्रगतीच्या मार्गातील केवळ इंग्रजांचा अडथळा दूर होऊन चालणार नाही. या मार्गात जातीयता, अज्ञान व विषमता हे फार मोठे अडथळे आहेत हे जोतीबांनी ओळखले होते. नवव्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या गुरुकन्येला विद्रूप केल्याचे पाहून त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. धर्माविषयी सत्य शोधण्याची त्यांच्या मनात प्रेरणा निर्माण झाली. चोहोबाजूला होत असलेल्या अघोरी कृत्यांमुळे माणुसकीला काळिमा फासला जात आहे याचा प्रत्यय त्यांना आला. त्यातच भर म्हणून आणखी एक प्रसंग घडला. ते एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाला गेले होते. वरातीच्या वेळी ते नवरदेवाबरोबर चालले होते. एका माळ्याच्या मुलाने ब्राह्मणाबरोबर चालणे ब्राह्मणांना आवडले नाही. त्यांनी फुल्यांचा अपमान केला. ते तडक घरी निघून गेले. समाजातील विषमतेबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली. सामाजिक न्यायासाठी संघर्ष केला पाहिजे असा त्यांनी निर्धार केला. समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यांसारख्या अनिष्ट गोष्टी केवळ धर्माज्ञा म्हणून निर्माण झाल्या आहेत. त्या बदलणे आवश्यक आहे याची खात्री त्यांना पटली. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची दिशा ठरविली.

Scanned with ACE Scanner

उच्चवर्णीयांच्या प्रतिगामी वृत्तीला धक्के देण्यासाठी त्यांनी सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे बारकाईने अवलोकन केले. इतर धर्मांचाही त्यांनी बारकाईने अभ्यास केला. त्यातील मानवतावादी तत्त्वज्ञानाने ते भारावून गेले. त्यांनी लोकसेवेचा निश्चय केला. अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश होय. समाज सुधारण्यासाठी शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे हे त्यांनी ओळखले होते. स्त्रिया व शूद्र यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करण्याचा निश्चय केला. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' या उक्तीप्रमाणे त्यांनी पुण्यात इ. स. १८४८ मध्ये मुलींसाठी शाळा सुरू केली. शाळेत शिक्षिका मिळत नव्हती म्हणून जोतीबांनी आपली धर्मपत्नी सावित्रीबाई यांना शिकवून शिकविण्याचे काम दिले. सनातनी लोकांना ही बाब आवडली नाही. त्यांनी अनेक मार्गांनी सावित्रीबाईंना त्रास दिला. सावित्रीबाईंना दगड मारून, टिंगल करून त्यांना छेडण्याचा खूप प्रयत्न केला. मात्र या दांपत्याने आपले कार्य सोडले नाही. सनातनी लोक एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी गोविंदरावांचे कान फुंकले. कुलीन स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी जाऊन शिक्षण देणे शोभत नाही असा सल्ला दिला. त्याचा परिणाम होऊन जोतीबांना घर सोडावे लागले. तरी ते आपल्या कार्यापासून परावृत्त झाले नाहीत. त्यांनी आपले कार्य नेटाने चालू ठेवले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी इ. स. १८५२ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली. शाळेत येणाऱ्या मुलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागे. दुपारच्या जेवणानंतर त्यांना पाणी मिळत नसे. जोतीबांनी ही अडचण दूर करण्यासाठी आपल्या राहत्या घरातील हौद अस्पृश्यांना खुला केला. यावरून त्यांचे नीतिधैर्य किती होते हे स्पष्ट होते.

त्या काळातील समाजात स्त्रियांवर वेगवेगळ्या रूढींद्वारे अन्याय होत होते. त्यांच्यावरील अत्याचार कमी व्हावे या हेतूने त्यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे काम हाती घेतले. त्यांनी विधवा विवाह, पुनर्विवाह यांस प्रोत्साहन दिले. अबलांची स्थिती ओळखून त्यांनी इ. स. १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन केले. त्यांनी अनेक समाजोपयोगी कामे केली. शेतकऱ्यांचे, मजुरांचे प्रश्न त्यांनी सरकार दरबारी मांडले. दुष्काळाच्या वेळीही त्यांनी भरीव कार्य केले. शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून सोडविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या या सर्व कार्यांमुळे सनातनी भयंकर चिडले. जोतीबांना मारण्यासाठी मारेकरी घातले, परंतु ते मारेकरी त्यांचे एकनिष्ठ सेवक बनले. धार्मिक व सामाजिक गुलामगिरीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. आपल्या सामाजिक क्रांतीला सुसंगत व धोरणाला पोषक असे नवज्ञान व व्यासपीठ निर्माण करण्यासाठी ही त्यांची योजना होती. याशिवाय त्यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड' यांसारखे ग्रंथ लिहून वेगवेगळ्या प्रश्नांना वाचा फोडली.

महाराष्ट्रातील अस्पृश्यता निवारण व स्त्रीमुक्ती चळवळीचे आग्रही म्हणून जोतीबांना ओळखले जाते. शिक्षणाचे महत्त्व ओळखून प्रचार व प्रसार करणारे थोर शिक्षणतज्ज्ञ, शेतकरी व कामकऱ्यांच्या सुखासाठी झगडणारे विचारवंत, समतेच्या तत्त्वावर मानवधर्म स्थापणारे म्हणून त्यांचा गौरव करावा लागतो. त्यांनी समाजसुधारणेची चळवळ खेड्यापर्यंत पोहोचविली. अशा या थोर माहात्म्याचा मृत्यू इ. स. १८९० मध्ये झाला.

Scanned with ACE Scanner

# महात्मा फुले यांचे कार्य

## १. स्त्री उद्धाराचे कार्य

जोतीबा फुले यांनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. त्यावेळच्या समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य यांसारख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे दृढमूल झाल्या आहेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी सर्व बाबींचा विचार करून प्रथम स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. हिंदू स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावयाचे ठरविले. भारतीय समाजाने स्त्रियांना समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. व्यक्तीचे जीवन विकसित करण्यासाठी शिक्षण हे एक प्रमुख साधन आहे असे जोतीबांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्यात स्वाभिमान निर्माण होतो. सत्य-असत्याचा उलगडा होतो. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे असे त्यांचे मत होते.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' या तत्त्वाचे ते पाईक होते. मुलांच्या कर्तव्याचे मार्गदर्शन मातेकडून होत असते. कर्तव्याची जाणीव झाली तरच देशाची प्रगती होते या विचाराचे ते होते. सनातन्यांच्या मते स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म व समाज यांच्या विरुद्ध वर्तन करणे होय. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे भ्रष्टाचार करणे असे मानले जात होते. स्त्रीला शिक्षण दिले तर स्त्री कुमार्गाला लागेल आणि घरच्या सुखात अडसर येईल. मुलींनी शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल, अशा खुळ्या समजुती समाजात रूढ होत्या. स्त्रियांना चपला, छत्री वापरण्यास मनाई होती. स्त्रियांना घराबाहेर पडणे शिष्टसंमत मानले जात नव्हते. चूल आणि मूल एवढेच त्यांचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले होते. बालविवाह, जरठ कुमार विवाह यांच्या प्रथा असल्यामुळे विधवांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाजाकडून त्यांना तुच्छतेची वागणूक दिली जात होती. केशवपन करून विद्रूप केले जाई. धार्मिक विधीपासून व उत्सवापासून वंचित केले होते. त्यांना अभागिनी मानले जात होते. स्त्री परतंत्र, अबला म्हणून ओळखली जात होती. एखाद्या विधवेकडून कुकर्म घडलेच तर तिला फार मोठे कठोर शासन समाज करीत असे. एकंदरीत त्या काळात समाजाच्या स्त्रीबाबतच्या अपेक्षा, अन्यायी व पक्षपातीपणाच्याच होत्या. क्रूर व लज्जास्पद चालीरीतीमुळे स्त्रियांची दैन्यावस्था झाली होती.

समाजाने अनेक बंधनांनी स्त्रियांना जखडून ठेवले होते. त्यांचे सर्व हक्क डावलले होते. समानता व मानवतेच्या भूमिकेतून त्यांच्याकडे पाहिले जात नव्हते. उपभोग्य वस्तू अशीच त्यांच्याकडे पाहण्याची वृत्ती होती. अशा वेळी महात्मा जोतीबा फुल्यांनी स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी त्यांनी फार मोठे कष्ट सहन केले. स्त्री ही समाजाचे मूळ आहे असे मानून जोतीबांनी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येबाबत भरीव कार्य केले.

- **स्त्रीशिक्षण :** सनातन्यांच्या आक्षेपांना प्रत्युत्तर देण्यासाठी जोतीबांनी प्रथम स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण. आपण जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एकट्याला दिल्यासारखे आहे. परंतु जर एका स्त्रीला शिक्षण दिले

तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे हे ओळखून जोतीबांनी स्त्रीशिक्षणाला प्रारंभ केला. त्या काळी स्त्रियांच्या शिक्षणाची पुण्यात अजिबात सोय नव्हती. अशा प्रतिकूल परिस्थितीत जोतीबा फुले यांनी पुण्यात इ. स. १८४८ मध्ये मुलींसाठी एक शाळा सुरू केली. अस्पृश्य समाजातील स्त्रियांना तेथे शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतीबा स्वतः शिक्षकाचे काम करीत होते. स्वतंत्रपणे मुलींसाठी शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. या शाळेत अस्पृश्यांच्या मुलींना शिकविण्यासाठी शिक्षिका मिळेना. म्हणून जोतीबांनी सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्याविरुद्ध प्रचंड संतापाची लाट उसळली. सनातन्यांनी सावित्रीबाईंना शाळेत जाता येता त्रास देण्यास सुरुवात केली. चिखल फेकणे, धाण टाकणे, दगड मारणे, शिव्या देणे अशा प्रकारे त्यांना त्रास दिला जात होता. मात्र या माउलीने हा त्रास सहन करून आपले कार्य चालूच ठेवले. सनातन्यांनी चिडून गोविंदरावांचे कान फुंकले. कुलीन व घरंदाज स्त्रियांनी शाळेत जाऊन शिकविणे प्रशस्त नाही असा सल्ला त्यांनी दिला. गोविंदरावांनी जोतीबांना एकतर घर सोडा किंवा शाळेत सावित्रीबाईंना शिक्षिका म्हणून काम करण्यास बंदी करा अशी आज्ञा केली. जोतीबांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला. परंतु आपला सुधारणेचा मार्ग सोडला नाही. अशा अडचणीच्या वेळीही जोतीबा डगमगले नाहीत. त्यांनी आपले कार्य अत्यंत नेटाने चालू ठेवले. समाजातील कनिष्ठ वर्गाला ज्ञानाचे दरवाजे उघडण्याचे क्रांतिकारक कार्य जोतीबांनी केले.

परंतु ही पहिली मुलींची शाळा बंद पडली. म्हणून जोतीबा नाउमेद झाले नाहीत. त्यांनी इ. स. १८५१ मध्ये बुधवार पेठेत दुसरी मुलींची शाळा सुरू केली. इ. स. १८५१ मध्येच रास्ता पेठेत तिसरी व १८५२ मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरू केली. या कार्याला सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त व्हावे म्हणून जोतीबांनी आपल्या मित्रांच्या साहाय्याने एक कार्यकारी समिती स्थापन केली. त्यात अनेक मान्यवर व्यक्ती होत्या. जोतीबांना त्यांच्या कार्यात एतद्देशीय व युरोपीय लोकांनी प्रारंभापासून सर्व प्रकारचे साहाय्य केले. सरकारनेही या कार्याला यथाशक्ती सहकार्य केले. जोतीबांच्या या अभिनव उपक्रमाबद्दल विश्रामबाग येथे सत्कार करण्यात आला. जोतीबांनी स्त्रीशिक्षणाला महाराष्ट्रात एक वेगळी दिशा लावून दिली.

● **विधवा पुनर्विवाह :** जोतीबा फुले ब्राह्मणद्वेष्टे होते असे म्हटले जाते. परंतु समाजातील कोणत्याही घटकावरील अन्यायाने त्यांचे मन व्याकूळ होत असे. त्या काळी ब्राह्मण समाजात विधवा स्त्रियांचे फार हाल असत. हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले. स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतीबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. त्यांनी इ. स. १८६४ मध्ये पुण्यातील गोखल्यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

● **बालहत्या प्रतिबंधक गृह :** विधवा पुनर्विवाहाची सुधारणा त्या काळी समाजाला पचनी पडणे कठीण होते. त्याला बराच अवधी लागणार होता. एखाद्या विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर तिची वाईट अवस्था होई. अशा विधवा पतितांना त्या काळी भ्रूणहत्या, आत्महत्या याशिवाय गत्यंतर नव्हते. अशा आपत्तीतून विधवांची सुटका व्हावी म्हणून जोतीबांनी

विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी व आपले मूल तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह आपल्या घराशेजारी इ. स. १८६३ मध्ये उघडले. त्या संदर्भात सर्वत्र भित्तिपत्रके वाटण्यात आली. त्यात असे म्हटले होते की, 'विधवांनो, इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा. तुम्ही आपले मूल न्यावे किंवा ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून आहे. त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल.' जोतीबांनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधक गृह हे भारतातील पहिलेच होते. या त्यांच्या उपक्रमावरून त्यांची दूरदृष्टी कशी होती याची कल्पना येते. या संस्थेची उपयुक्तता पटल्यावर पंढरपूर येथे बालहत्या प्रतिबंधक गृह उघडण्यात आले.

जोतीबांना मूलबाळ नव्हते. त्यांनी दुसरे लग्न करावे असा आग्रह वडील व इतर मित्रांनी धरला. त्यामुळे जोतीबा फुले दुःखी झाले. 'पुरुषाने पहिल्या पत्नीपासून मूल होत नाही म्हणून दुसरा विवाह करावा ही अत्यंत निष्ठुर चाल आहे.' असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांनी दुसरे लग्न केलेच नाही उलट काशीबाई या विधवेचा बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलगा दत्तक घेतला. यशवंत असे त्याचे नाव होते. तो ब्राह्मण जातीतील होता. त्यांनी असे करून आपण जातिभेद मानणारे नाही हे पटवून दिले. त्यांनी वडिलांच्या वर्षश्राद्धाचा विधी गरिबांना अन्नदान व विद्यार्थ्यांना पुस्तके वाटून पार पाडला. जोतीबांची विचारसरणी किती प्रगल्भ होती हे यावरून स्पष्ट होते. त्यांचे मनोधैर्य व त्यांच्या ठिकाणी असणारा मानवतावाद दिसून येतो. स्त्रियांसाठी जोतीबांनी केलेले कार्य सामाजिक जीवनातील एक युगप्रवर्तक असेच ठरले आहे.

## २. अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य

महाराष्ट्रात अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. १९ व्या शतकात ती तीव्र होती. उच्चवर्णीयांकडून अस्पृश्यांना अत्यंत हीन वागणूक दिली जात होती. समाजजीवनात त्यांना कोणतेही स्थान नव्हते. अस्पृश्यांना गावाच्या बाहेर राहावे लागे. दारिद्र्यातच त्यांचा जन्म होई व त्यातच त्यांचा अंत होई. स्पृश्य-अस्पृश्यांना शिवून घेत नसत. गावातून सकाळी व संध्याकाळी अस्पृश्यांना फिरण्यास मज्जाव होता. गळ्यात मडके व कमरेला खराटा बांधून दुपारच्या वेळीच त्यांना गावात येण्यास परवानगी होती. सवर्णांची सेवा करणे एवढेच त्यांचे कर्तव्य होते. अत्यंत हीन कामे त्यांच्याकडून करवून घेतली जात. विद्यार्जनाचा अधिकार त्यांना नव्हता. हा समाज अज्ञान अंधकारात पिचत पडलेला होता. सर्व बाजूंनी उपेक्षित जीवन त्यांना जगावे लागत होते. अशा कनिष्ठ वर्गातील लोकांचे अज्ञान, निरक्षरता दूर करण्यासाठी त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी ग्रंथ, काव्ये अशी उपयुक्त पुस्तकेही लिहिली आहेत. वर्णव्यवस्था हा हिंदू धर्माला लागलेला कलंक आहे. तो दूर करण्याचे कार्य जोतीबांनी हाती घेतले.

जोतीबा फुले हे सामाजिक समतेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. समाजातील पद-दलितांच्या उद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. अस्पृश्यता ही सामाजिक जीवनातील लाजिरवाणी बाब आहे. अशा वर्णभेदाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी त्यांनी शिक्षण या प्रभावी माध्यमाचा प्रचार व प्रसार केला. अस्पृश्यांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य जोतीबांनी हाती घेतले. अतिशूद्रांच्या शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रित

केले. इ. स. १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळ पेठेत स्वखर्चाने एक शाळा सुरू केली. इ. स. १८५३ साली आपल्या काही होतकरू मित्रांच्या साहाय्याने 'महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी' या नावाची संस्था काढली. त्यांच्या या कार्यास युरोपियन व एतद्देशीय शिक्षणप्रेमींनी सहकार्य केले. दक्षिणा प्राईज फंडातूनही काही आर्थिक साहाय्य मिळाले. इ. स. १८५८ पर्यंत या संस्थेमार्फत पुण्यात तीन शाळा सुरू करण्यात आल्या. शाळेतील मुलांना पाणी पिण्याची अडचण भासू लागली. म्हणून या महामानवाने आपल्या राहत्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला.

अस्पृश्यांमध्ये जागृती घडून यावी म्हणून याच वर्गातील लोकांचे त्यांनी सहकार्य घेतले. त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून उच्चभ्रू जमातीवर कठोर टीका केली आहे. जातिव्यवस्थेवर आणि दांभिकतेवर त्यांनी कोरडे ओढले आहेत. शूद्रांनी आपल्या उन्नतीसाठी विद्या संपादन करावी असा संदेश त्यांनी या ग्रंथात दिलेला आहे. या ग्रंथात जोतीबा म्हणतात, "ब्राह्मणाकडून तुमची फसवणूक कशी होत आहे हे माझ्या शूद्र बांधवांना सांगण्याच्या उद्देशानेच केवळ मी हा ग्रंथ लिहिला आहे."

### ३. सत्यशोधक समाजाची स्थापना

महाराष्ट्रात या दरम्यानच्या काळात एक नवसुशिक्षितांची पिढी उदयास आली होती. त्यांनी पाश्चात्त्य राष्ट्रांमधील सामाजिक संस्थांचे व विचारप्रणालीचे आकलन केले होते. शिक्षण, दळणवळणातील सुविधा, इतर सुधारणा यामुळे लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली होती. आपला धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, इतिहास इत्यादी विषय चिकित्सक पद्धतीने विवेचन करून लोकांना त्यातील गौरवास्पद भाग दाखविला जाऊ लागला. सामाजिक कर्तव्याची जाणीव करून दिली. सामाजिक प्रबोधनाचे ते युग होते. सामाजिक सुधारणेसाठी शूद्रातिशूद्रांची स्थिती सुधारण्यासाठी जोतीबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना इ. स. १८७३ मध्ये केली. धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे मुख्य उद्दिष्ट होते. 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या दोन पुस्तकांत जोतीबांनी सत्यशोधक समाजाबद्दलचे आपले विचार मांडले आहेत. 'सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।' हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना ते म्हणतात, "ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांना मुक्त करण्यासाठी व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटित आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता हा समाज आहे." समता, बंधुता व स्वातंत्र्य हे विचार रुजविण्यासाठी त्यांनी हा समाज स्थापन केला होता. सर्व जाती-धर्मांच्या लोकांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे व समाजजागृतीचे कार्य व्हावे हा यामागील हेतू होता. कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणारी ती चळवळ होती.

'सत्यशोधक समाज' ही समाजसुधारणेची महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. या समाजाची प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे-

Scanned with ACE Scanner

१. सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्यांचा आईबाप आहे.

२. आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते त्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यास पुरोहिताची आवश्यकता नसते.

३. वरील तत्त्व कबूल असल्यास कोणालाही या समाजाचे सदस्य होता येईल.

सभासद होताना सदस्यांना पुढीलप्रमाणे शपथ घ्यावी लागे, ''सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत. सबब ती माझी भावंडे आहेत. अशा बुद्धीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीच्या वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन.''

सत्यशोधक चळवळ समाजातील कोणत्याही एका विशिष्ट वर्गाविरुद्ध नव्हती. बहुजन समाजात जागृती घडवून आणणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट होते. या समाजाच्या अनेक ठिकाणी शाखा निघाल्या. पुरोहिताशिवाय लग्ने लावण्यासाठी मंगलाष्टके मराठीत रचली गेली. जातिभेद कमी व्हावा हाच त्यामागील प्रमुख हेतू होता. सत्यशोधक समाजाद्वारे उभारण्यात आलेला लढा हा सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक गुलामगिरीविरुद्धचा लढा होता. या समाजाच्या कार्यामुळे स्वार्थनिरपेक्ष कार्यकर्त्यांची नवी पिढी उदयास आली. या समाजाविषयी धनंजय कीर म्हणतात, ''आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही हिंदुस्थानातील अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय.''

## ४. शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य

हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. देशाची समृद्धी व भरभराट शेतकऱ्यांवर अवलंबून असते व असे असले तरी भारतातील शेतकरी सुखी व समाधानी नव्हता. मागासलेपणा, अज्ञान, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य यामुळे भारतीय शेतकरी पिचलेला होता. जोतीबांनी शेतकऱ्यांच्या हलाखीचे सूक्ष्म अवलोकन केले होते. दीनदुबळ्यांची दुःखे पाहून त्यांना फार दुःख होई. खेड्यातील शेतकऱ्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. कष्टकरी समाजाच्या सुखदुःखाशी ते तादात्म पावले होते. सावकाराकडून शेतकऱ्यांचे शोषण होत होते. अशा शोषित लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याचा निश्चय त्यांनी केला. ते शेतकऱ्यांची गाऱ्हाणी परखडपणे मांडणारे महाराष्ट्रातील समाजचिंतक होते. शिक्षणाशिवाय या कष्टकरी समाजाची स्थिती सुधारणार नाही हे त्यांनी ओळखले. त्यासाठी त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात शिक्षणाअभावी समाजाची कशी दुर्दशा झाली आहे. याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

विद्येविना मती गेली; मतीविना नीती गेली;
नीतीविना गती गेली; गतीविना वित्त गेले;
वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले.

Scanned with ACE Scanner

शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण द्यावे, सरकारने त्यासाठी खास प्रयत्न करावेत, शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृहे काढावीत, धंदेशिक्षण द्यावे, कनिष्ठ वर्गातील लोकांना नोकऱ्यांत प्राधान्य द्यावे. अशा सूचना त्यांनी केल्या आहेत. शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सर्वतोपरी मदत करावी असा आग्रह त्यांनी धरला. इ. स. १८७७ च्या दुष्काळाच्या वेळी त्यांनी दुष्काळ पीडितांना मदत देण्यास पुढाकार घेतला होता. तसेच धनकवडी येथे दुष्काळ पीडित विद्यार्थ्यांसाठी कँपही उभारला होता.

शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याविषयी त्यांनी सरकारला सूचना केल्या होत्या. त्यात पाणीपुरवठा योजनेस त्यांनी अग्रक्रम दिला होता. तलाव, बंधारे, धरणे, विहिरी यांद्वारे शेतीला जास्तीतजास्त पाणी उपलब्ध करून द्यावे, पीक संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदुकांचे परवाने द्यावेत, कालव्याचे पाणी वेळेवर मिळावे, शेतीवर वाजवी कर आकारावा, शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करावे, भोळ्या समजुतीपासून त्यांना दूर करावे, जोडधंदा म्हणून पशुपालनास चालना द्यावी, शेतीची माहिती देण्याऱ्या पुस्तिका छापाव्यात, शेतीची पद्धत व अवजारे यात सुधारणा कराव्यात, कमी व्याजाने कर्जे उपलब्ध करून द्यावीत याबाबत त्यांनी आपले विचार सरकार दरबारी मांडले.

शेतकऱ्यांच्या हिताची चिंता त्यांना कशी होती हे इ. स. १८८८ मधील ड्यूक ऑफ कनॉट यांच्या भारत भेटीवरून दिसून येईल. त्याचबरोबर त्यांची निर्भय व निर्भीड वृत्तीही दिसून येते. महाराणी व्हिक्टोरिया यांचे चिरंजीव ड्यूक ऑफ कनॉट यांनी हिंदुस्थानला भेट दिली. त्या वेळी पुण्यात त्यांना मानपत्र देण्याचा समारंभ झाला. या समारंभाचे निमंत्रण महत्त्वाच्या व्यक्तींना दिले होते. त्यात जोतीबांचा नंबर होता. समारंभास सर्व जण नीटनेटका पोशाख करून गेले होते. मात्र जोतीबा फुले शेतकऱ्यांच्या वेशात म्हणजे - डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर घोंगडी, हातात काठी व पायात फाटक्या वहाणा घालून भेटीस गेले होते. त्यांना ज्या वेळी बोलण्याची परवानगी मिळाली त्या वेळी त्यांनी मांडलेले विचार चिंतनीय आहेत. ते म्हणाले, "ड्यूक साहेब, या ठिकाणी उत्तमोत्तम पोशाख करून उपस्थित असलेले हे लोक हिंदुस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे आणि ते जो पोशाख वापरतात त्याच पेहरावात मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीला आलो आहे. हिंदुस्थानच्या या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करावयाचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा. त्यांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळण्याची सोय करा. असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप महाराणींना कळवा."

## ५. शिक्षणविषयक विचार

जोतीबांचे स्त्रीशिक्षण व अस्पृश्यांसाठी केलेले कार्य आपण पाहिलेच आहे. त्यात त्यांचे शैक्षणिक विचार सामावलेले आहेतच. मुलींसाठी शाळा काढून जोतीबांनी असामान्य धैर्य दाखविले, त्याचबरोबर कनिष्ठ वर्गाला शिक्षणाचे दरवाजे काढून उघडण्यासाठीही प्रयत्न केले. बहुजन समाजाची प्रगती शिक्षणाशिवाय होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. भारतातील शिक्षणाचा प्रसार पाहण्यासाठी सरकारने हंटर आयोगाची स्थापना केली. विल्यम हंटर त्याचे

अध्यक्ष होते. १८८२ मध्ये या आयोगासमोर साक्ष देताना जोतीबांनी मांडलेले विचार चिंतनीय व द्रष्टेपणाचे होते हे स्पष्ट होते. ते म्हणतात, ''सरकार गरीब शेतकऱ्यांकडून जो सारा वसूल करते त्या वसुलाचे उत्पन्न वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावरच खर्च होते. वरिष्ठ वर्ग स्वतः पुरताच विचार करतो, म्हणून सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. बारा वर्षांखालील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत दिले पाहिजे.''

प्राथमिक शिक्षक कसा असावा या संदर्भात हंटर आयोगापुढे बोलताना जोतीबा फुले म्हणतात, ''प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षित असावेत. त्याचबरोबर ते शेतकरी वर्गातील असावेत. ब्राह्मण वर्गातील शिक्षक धार्मिक पूर्वग्रहामुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरी वर्गातले शिक्षक त्या वर्गात अधिक सहजपणे मिसळतील. समाजातील कनिष्ठ थरांशी ते तत्परतेने एकरूप होतील.''

महाविद्यालयीन शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट करताना त्यांनी पुढील उद्‌गार काढले. ''सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे असे व्यावहारिक नाही. कारकून आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर पैदा होण्यास मात्र ते उपयुक्त ठरणारे आहे.''

हंटर आयोगापुढे त्यांनी दिलेली साक्ष पाहिल्यानंतर शिक्षणाविषयी त्यांचे विचार किती द्रष्टेपणाचे होते हे आपणास दिसून येते. शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले आहे हे त्यांनी स्पष्ट नमूद केले आहे. विशेषतः ग्रामीण व कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे असा आग्रह त्यांनी धरला होता. शिक्षणासाठी घेतलेला कर शिक्षणासाठी खर्च होत नाही अशी त्यांची रास्त तक्रार होती. त्यांनी शिक्षणविषयक प्रतिपादनात सत्यनिष्ठा, शीलसंवर्धन, नीतिमत्ता, सौजन्य, प्रगतीपर विचार व व्यवहारज्ञान इत्यादी गोष्टींवर भर दिला होता. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या शिक्षणामधून प्रगतीपर विचारांचे बाळकडू मिळाले पाहिजे; त्यांच्या मनावर नैतिकतेचें संस्कार झाले पाहिजेत. अशा प्रकारची शिक्षणपद्धती त्यांना अपेक्षित होती. प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी; नगरपालिकांनी स्वखर्चाने शाळा चालवाव्यात; शाळांची तपासणी शिक्षणखात्यामार्फत व्हावी, ग्रामीण भागात मोडी, बालबोध वाचन, हिशेब-इतिहास इत्यादींचे सर्वसाधारण ज्ञान व त्याच्या जोडीला शेतकीचे ज्ञान द्यावे असे त्यांचे विचार होते.

## ६. धर्मविषयक विचार

जोतीबांवर ईश्वरनिष्ठेचे व धर्मशीलतेचे संस्कार झाले होते. तसेच त्यांची सामाजिक विचारप्रणाली धर्ममीमांसेवर अवलंबून आहे. सामाजिक प्रश्नांचा धर्माशी संबंध असतोच. जोतीबा फुले अस्तित्वास मानणारे होते. तो सर्वज्ञ, सर्वसमर्थ, परम न्यायी व दयाळू आहे अशी त्यांची धारणा होती. धर्मकृत्यातील मिथ्याचार व आंधळी रूढिप्रियता यांवर त्यांनी कठोर आघात केले आहेत. जोतीबा फुले कट्टर एकेश्वरवादी होते. परमेश्वर निर्गुण निराकार आहे, तो सर्व चराचरात सामावलेला आहे. अशा परमेश्वराला अनन्यभावाने शरण जावे असे ते प्रतिपादन करीत.

Scanned with ACE Scanner

जोतिबांनी ईश्वराला 'निर्मिक' असे म्हटले आहे. खरा ईश्वरप्रणीत धर्म एकच आहे. त्यांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. परमेश्वराची त्याच्या शुद्ध स्वरूपात आराधना केली पाहिजे. त्याच्या वेगवेगळ्या रूपांत आराधना त्यांना मान्य नव्हती. अवतार कल्पना त्यांनी त्याज्य मानली आहे. जोतीबांनी पूजा, नामस्मरण, नैवेद्य, अन्नदान, अनुष्ठान, पापपुण्य इत्यादींचा ऊहापोह केला आहे. धर्माचरण हे ईश्वरी योजनेशी सुसंगत असले पाहिजे. मानवाच्या नैतिक उन्नतीला प्रेरक व पोषक असले पाहिजे. तेव्हा आपल्याशी असलेले द्रव्य, काळ व शक्ती यांचा विनियोग मनुष्यजातीच्या कल्याणासाठी करावा असा संदेश त्यांनी दिला आहे.

'सर्व साक्षी जगत्पती । त्याला नको मध्यस्थी ।' हे त्यांच्या धर्मविचारातील प्रमुख सूत्र होते. ब्राह्मण्यामुळे धर्माला बाजारी स्वरूप आले आहे. कर्मकांड, देवभोळ्या समजुती, अंधश्रद्धा यांचे स्तोम माजले आहे. कनिष्ठांच्या अज्ञानामुळे वरिष्ठ वर्ग त्यांचे शोषण करीत आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. ते त्यांनी आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांतून व्यक्त केले आहे. त्यांनी सत्याला धर्मविचारात महत्त्वाचे स्थान दिले आहे. ते म्हणतात, 'सत्य सर्वांचे आदिघर । सर्व धर्मांचे माहेर ॥' हिंदू धर्मातील वर्णवर्चस्व, विषमता, उच्चवर्णीयांचे विशेष अधिकार, शूद्रांवर लादलेले अन्यायी निर्बंध या संदर्भातील त्यांचे विचार प्रगत होते. सर्वधर्मसमावेशक अशा उदारमतवादी कुटुंबाचे चित्र त्यांनी रेखाटले होते. त्यांच्या या विचाराने बहुजन समाजात जागृती झाली. त्यांनी समतेवर आधारलेल्या मानवधर्माचा पुरस्कार केला.

### ७. राजकीय विचार

जोतीबा फुल्यांना सर्व प्रकारच्या गुलामगिरीचा तिरस्कार होता. ब्रिटिशांनी भारतात राजकीय गुलामगिरी प्रस्थापित केलेली आहे हे जोतीबांना मान्य नव्हते. विद्यार्थीदशेपासूनच त्यांना या गुलामगिरीबद्दल चीड होती. त्यांनी इंग्रजी राजवट उलथून टाकण्याच्या उद्देशाने प्रारंभी लहुजीबुवा मांग यांच्याकडून नेमबाजी, दांडपट्टा इत्यादींचे शिक्षण घेतले. परंतु इंग्रजांचे राज्य पाचपंचवीस तरुणांनी हुल्लडबाजी करून उलथून टाकण्याइतके लेचेपेचे नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी हा मार्ग सोडून दिला.

सामाजिक विषमतेमुळे समाजात फूट पडलेली आहे. ती नष्ट केल्याशिवाय इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्तता मिळणार नाही, म्हणून त्यांनी बहुजन समाजावर लादलेल्या सामाजिक, आर्थिक व धार्मिक गुलामगिरीचे उच्चाटन करण्याचे कार्य हाती घेतले. इंग्रजी सत्तेमुळे काही अंशी कनिष्ठांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यांचा उत्कर्ष झाला. अनेक सुधारणा प्रस्थापित झाल्या. यामुळेच जोतीबांना इंग्रजी शासनकर्त्यांबद्दल सहानुभूती होती. त्यांनी इंग्रजी अधिकारी व सत्ता याविषयी बऱ्याच वेळा प्रशंसोद्गार काढले आहेत. विशेषतः दलितवर्गाच्या उद्धाराच्या कार्यात स्वकीय उच्चभ्रू लोक नेहमीच अडथळे आणत होते. मात्र अशा वेळी शासनातील लोक त्यांना सहकार्य करीत होते. ख्रिस्ती धर्माच्या मानवतावादी कार्याचाही त्यांना जवळून अनुभव आला होता. त्यामुळे इंग्रजी राज्यात बहुजन समाजाचे कल्याण होईल असे त्यांचे मत बनले होते.

जोतीबांनी जरी इंग्रजी सत्तेला पाठिंबा दिला असली तरी, ज्या वेळी शासन बहुजन

समाजाच्या उन्नतीआड येत असे त्या वेळी त्यांच्यावर त्यांनी कठोर टीका केली आहे. सरकारचे धोरण जेव्हा शूद्रातिशूद्रांच्या, विशेषतः शेतकऱ्यांच्या हितसंबंधांना विघातक आहे असे त्यांना दिसून आले त्या वेळी त्यांनी सरकारवर टीका केली. सरकारच्या शिक्षणविषयक धोरणावरही त्यांनी टीका केली होती. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सरकार जनतेला सहकार्य करीत नाही अशी टीका त्यांनी केली होती. इ. स. १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेत बहुतांशी वरिष्ठ वर्गाचे लोक होते. राष्ट्रीय सभेने प्रथम ज्या मागण्या मांडल्या त्यास जोतीबांनी विरोध केला. कारण त्या वरिष्ठ लोकांच्या हिताच्याच होत्या. इ. स. १८८९ मध्ये राष्ट्रीय सभेचे मुंबईत अधिवेशन झाले. त्यात जोतीबांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत शेतकऱ्यांना त्यात सामावून घेतले जात नाही तोपर्यंत राष्ट्रीय म्हणवून घेण्याचा अधिकार तिला पोहोचत नाही. यावरून त्यांचे विचार कसे होते हे स्पष्ट होते.

## ८. इतर कार्ये

जोतीबा चरितार्थासाठी वेगवेगळ्या प्रकारची बांधकामे घेत होते. त्यामुळे त्यांचे मजुरांशी जवळचे संबंध आले. त्यांच्या परिस्थितीचे त्यांनी सूक्ष्म अवलोकन केले. अधिकारी व ठेकेदार त्यांचे शोषण करतात हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मजुरांची गाऱ्हाणी वेशीवर टांगली. त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. त्यांच्याच प्रोत्साहनामुळे नारायण लोखंडे याने मुंबईच्या गिरणी कामगारांची 'मिल हँड असोसिएशन सोसायटी' नावाची संघटना स्थापन केली. तिच्यामार्फत गिरणी कामगारांचे प्रश्न सरकारच्या निदर्शनास आणून दिले. आठ वर्षांच्या आतील मुलांना कामावर घेऊ नये, स्त्रियांना विशेष सवलती द्याव्यात, कामगारांना मध्यंतरी विश्रांतीसाठी सुट्टी इत्यादींबाबत त्यांनी सरकारला निवेदन सादर केले होते. त्यांनी स्थापन केलेली भारतातील पहिलीच मजूर संघटना होय.

जोतीबा पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. त्या वेळी त्यांनी सार्वजनिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले. सार्वजनिक सोई उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. पुण्यात मार्केटची इमारत बांधण्यासाठी आणि रिपनला मानपत्र देण्याच्या समारंभास त्यांनी उघड विरोध केला. यावर होणारा खर्च शिक्षणावर करावा अशी विधायक सूचना त्यांनी केली.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर भागात सावकार शेतकऱ्यांवर भयंकर जुलूम करीत होते. त्यामुळे शेतकरी चिडले. त्यांनी जमिनी पडीक ठेवण्याचा निर्णय घेतला. जोतीबांनी या लढ्यात भाग घेतला. सरकारने मध्यस्थी केली. हा संप यशस्वी झाला. जोतीबांनी सरकारने शिवाजी महाराजांच्या समाधीची व्यवस्था स्वतःकडे घ्यावी असा अर्ज केला होता. न्या. रानडे यांनी पुण्यात स्वामी दयानंद सरस्वती यांची हत्तीवरून मिरवणूक काढण्यासाठी जोतीबांचे सहकार्य घेतले होते. अशा वेगवेगळ्या सामाजिक कार्यात ते सक्रिय भाग घेत असत. अन्यायाविरुद्ध ते आवाज उठवत असत.

## ९. जोतीबा फुले यांचे वाङ्मयदर्शन

जोतीबा फुले हे संशोधक नव्हते. ते पंडितही नव्हते. ते भाषाशास्त्रज्ञही नव्हते. परंतु ते मूलगामी विचारवंत होते. बहुजन समाजाचे प्रबोधन व दलितमुक्तीचा प्रचार यासाठी त्यांनी

Scanned with ACE Scanner

लहान-मोठी पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे हे सर्व लेखन सत्यशोधक समाजाशी निगडित आहे. जोतीबांनी आपली नजर खेड्याकडे, श्रमजीवी वर्गाकडे वळविली होती. शेतकरी, कष्टकरी, शूद्र समाज हाच त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू होता. त्यांची दुःखे वेशीवर टांगण्यासाठीच त्यांनी या ग्रंथाचे लेखन केले होते. त्यांच्या ग्रंथातील भाषा मराठमोळी आहे. त्यांच्यावर संस्कृतचे अगर इंग्रजीचे दडपण नव्हते. खडतर जीवन जगणाऱ्या लोकांच्या भावनेशी तादात्म्य पावलेली त्यांची भाषा होती. त्यांच्या ग्रंथातील समाजाच्या दैन्यावस्थेची वर्णने मन हेलावून टाकणारी आहेत. त्यांनी पुढील ग्रंथ लिहिले.

'तृतीय रत्न' हे नाटक त्यांनी लिहिले. 'पुरोहित लोक आपल्या मतलबी धर्मांच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रांस फसवून कसे नाडतात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या निष्पक्षपाती धर्माच्या आधारे अज्ञानी शूद्रांस खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्य मार्गावर आणतात' ते दाखवून त्याचे मर्म लोकांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न या नाटकात केला.

छत्रपती शिवरायांचे कर्तृत्व व पराक्रम यांच्याकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा' हा पोवाडा रचला. या पोवाड्यात त्यांनी शिवचरित्रातील सर्व महत्त्वाचे प्रसंग सरळ व प्रभावी भाषेत ग्रथित केले आहेत. त्यांनी स्वतःस 'कुळवाडीभूषण' अशी संज्ञा लावून घेतली आहे.

जोतीबांनी ग्रंथनिर्मिती सहेतुक केली होती. शूद्रातिशूद्रांच्या दुरावस्थेची कारणे विशद करून त्यांचे प्रबोधन करणे, बहुजन समाजातील सुशिक्षितांना आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देणे आणि मागासलेल्या समाजात शिक्षणप्रसार झाल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणार नाही हे सरकारला पटवून देण्यासाठीच त्यांनी लिखाण केले होते. 'ब्राह्मणांचे कसब' हे पद्यात्मक पुस्तक लिहून त्यांनी स्वार्थसाधू ब्राह्मणांच्या कारवाया उघड करून दाखविल्या आहेत. आपल्या सांस्कृतिक परंपरेतील ब्राह्मणमाहात्म्य व विद्येची मक्तेदारी आणि मागासलेल्या जातींतील अज्ञान, अंधश्रद्धा व रूढिप्रियता या विषयांची या ग्रंथात चर्चा केली आहे.

जोतीबांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ इ. स. १८७३ साली प्रकाशित केला. धार्मिक, सामाजिक व आर्थिक अथवा इतर कोणत्याही गुलामगिरीबद्दल त्यांच्या मनात तिटकारा होता. अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या लोकांना त्यांनी हा ग्रंथ अर्पण केला आहे. या ग्रंथात ब्रह्मदेवाच्या उत्पत्तीपासून ते भटपांड्यांच्या बंडापर्यंतचा समग्र इतिहास कथन केला आहे. सर्वसामान्यांना ज्ञानाचे दरवाजे बंद झाल्यामुळे पुरोहितांच्या मध्यस्थीची गरज निर्माण झाली. या मध्यस्थीवर या पुस्तकात कठोर टीका केली आहे.

त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ १८८३ मध्ये लिहिला. मात्र तो त्यांच्या हयातीत प्रसिद्ध झाला नाही. या ग्रंथात शेतकऱ्यांच्या खालावलेल्या स्थितीचे वर्णन आहे. शेतकऱ्यांच्या दैनावस्थेची अनेकविध कारणे देऊन त्यावर उपायही सुचविले आहेत. त्यांनी 'सत्सार' हे नियतकालिक सुरू केले होते. त्यात त्यांनी सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह केला आहे. त्याचबरोबर त्यांनी 'इशारा' हे पुस्तक लिहिले. त्यात जातिभेदाविषयीचे विचार मांडलेले आहेत.

Scanned with ACE Scanner

'सार्वजनिक सत्यधर्म' हा त्यांचा शेवटचा ग्रंथ होय. या ग्रंथात धार्मिक, सामाजिक, नैतिक, व्यावहारिक वगैरे विविध विषयांची चर्चा केली आहे. सुख, पूजा, नामस्मरण, नैवेद्य, स्वर्ग, स्त्री-पुरुष, पाप-पुण्य, जातिभेद, नीती, दैव इ. प्रश्नांचा त्यांनी ऊहापोह केला आहे. मनुष्यमात्राच्या जीवितसाफल्यासाठी धर्मभावनेची आवश्यकता आहे अशी त्यांची धारणा होती, हे या ग्रंथांतून स्पष्ट होते. या ग्रंथांच्या प्रास्ताविक निवेदनात जोतीबा फुले म्हणतात, "या आपल्या अमर्याद विस्तीर्ण पोकळीमध्ये निर्मिकाने अनंत सूर्यमंडळासह त्यांच्या ग्रहोपग्रहांसहित तत्संबंधी एकंदर सर्व प्राणिमात्रांस उत्पन्न केले आहे. त्यापैकी आपण सर्व मानव स्त्री-पुरुषांनी त्याविषयी काय-काय करावे आणि आपण सर्व मानव स्त्री-पुरुषांनी त्याचे स्मरण मनी जागृत ठेवून एकमेकांशी कोणत्या तऱ्हेने आचरण केल्यामुळे त्यांस आनंद होणार आहे, यास्तव मी त्याच्या कृपेने एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांच्या हितासाठी हा लहानसा ग्रंथ रचिला आहे." यावरून या ग्रंथलेखनाचा उद्देश स्पष्ट होतो. वेगवेगळ्या जातिजमातींत विखुरलेल्या कष्टकरी लोकांना एकत्र आणून त्यांच्यात ऐक्यभाव निर्माण केला पाहिजे. अस्पृश्य बांधवांना बहिष्कृत न मानता त्यांच्याशी बंधुभावाने वागण्यास प्रारंभ केला पाहिजे आणि सर्वांनी मिळून दास्यमुक्तीसाठी सतत झगडत राहिले पाहिजे हा त्यांच्या तत्त्वप्रणालीतील भाग होता. त्यांच्या ग्रंथलेखनात तो सर्वत्र दिसून येतो.

## योग्यता

जोतीबा फुले हे पददलित वर्गाच्या उद्धारासाठी झटले. त्यांनी समाजसेवा करताना वैयक्तिक मोह कधीच बाळगला नाही. त्यांनी आपले व्यक्तिगत जीवन समाजजीवनात विलीन केले होते. त्यांनी समाजातील वर्णव्यवस्थेवर हल्ला चढविला. जातीवर त्यांनी कडाडून टीका केली. त्यांचा रोख ब्राह्मणावर नसून ब्राह्मण्यावर होता. ते एक थोर समाजसेवक होते. ते नेहमी आपल्या कार्यात एकाग्र होत असत. सर्वांशी ते सहकार्याने वागत. त्यामुळे त्यांनी हजारोंचा विश्वास संपादन केला होता. सत्यशोधक समाजाच्या रूपाने त्यांनी महाराष्ट्रात प्रबळ संघटना निर्माण केली. तिच्यामार्फत त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेतले. सत्य, समता आणि मानवतावाद या शिकवणीवर त्यांचा भर होता. जोतीबा एकेश्वरी मताचे, नीतिवादी व बुद्धिप्रामाण्यवादी होते. हृदयाने थोर व कृतीने उदार होते. ज्यांचे हृदय गरिबांसाठी द्रवते तोच महात्मा होय, या उक्तीत जोतीबा बसणारे होते. कनिष्ठ वर्गाच्या उद्धारासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. जोतीबांनी सुरू केलेल्या ब्राह्मणेतर चळवळीत कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाला चालना मिळाली आणि त्यांच्या ठिकाणी आपल्या राजकीय हक्कांची जाणीव निर्माण झाली.

जोतीबांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. महाराष्ट्रात त्यांनी शिक्षणाची व अस्पृश्यांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. अस्पृश्यांच्या अन्यायाला वाचा फोडली सामाजिक गुलामगिरीविरुद्ध त्यांनी बंड केले. शेतकऱ्यांची दुःखे त्यांनी वेशीवर टांगली. जी गोष्ट त्यांना पटली तिचा पाठपुरावा त्यांनी केला. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे मोल त्यांनी दिले, परंतु आपल्या कार्यापासून ते अजिबात ढळले नाहीत. त्यांची उक्ती जशी तशीच कृती होती, म्हणूनच

Scanned with ACE Scanner

त्यांना कर्ते सुधारक म्हणून संबोधले जाते. त्यांनी मूलगामी समाजक्रांतीचा विचार मांडला होता. वरकरणी समाजसुधारणा त्यांना मान्य नव्हत्या. संपूर्ण समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल त्यांना अभिप्रेत होता. वर्णव्यवस्था व जातिभेद याबाबत त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट होते. या दोन्ही बाबी मोडून काढल्या पाहिजेत असेच ते स्पष्ट सांगत. सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक गुलामगिरीवर त्यांनी कठोर टीका केली. त्यांना कोणत्याही प्रकारची गुलामगिरी मान्य नव्हती. त्यांनी बहुजन समाजाला जागृत केले. प्रबोधनाची चळवळ त्यांनी खेड्यापर्यंत पोहोचविली. सर्वसामान्य समाजाला संघटित करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या कार्याचे वर्णन करताना धनंजय कीर म्हणतात, ''जोतीबांचे नाव जोती आणि जोती म्हणजे ज्योत. त्या ज्योतीने सामाजिक समता, मानवता आणि विवेकवाद यांवर प्रकाश टाकून राष्ट्रास खरा मार्ग दाखविला. त्यांचे उपनाव होते फुले आणि फुले म्हणजे फुलांचा धंदा करणारे फुलमाळी. या माळ्याने राष्ट्ररूपी बागेतील सामाजिक एकतेच्या वाढीला विरोध करणारी तणे, बांडगुळे उपटून फुलझाडांची उत्तम जोपासना केली.'' धनंजय कीर पुढे म्हणतात, ''जोतीबांनी स्त्रीजीवनाच्या बंधनांना तडा घालविला. तिला स्वातंत्र्याचा मार्ग चोखाळण्यास समर्थ बनविले. पुरोहित वर्गाने कनिष्ठ वर्गाच्या मानेभोवती मानसिक गुलामगिरीचे पाश आवळले होते. ते त्यांनी तोडून टाकले. शूद्र व अतिशूद्रांची पिळवणूक करणाऱ्यांचे त्यांनी वाभाडे काढले. शेतकरी सुखी तर देश सुखी हे तत्त्व त्यांनी लोकांच्या मनावर ठसविले.'' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे फुले होय.''

जोतीबांची वाङ्मयनिर्मिती मराठी भाषेत मोलाची भर घालणारी आहे. समाज, राजकारण, शिक्षण, जातीयता इत्यादी क्षेत्रांतील त्यांची कामगिरी गौरवास्पद आहे. सामाजिक सुधारणेच्या सर्व अंगांना त्यांनी स्पर्श केला होता. बहुजन समाजाच्या आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी ते झटले. समाजाला धार्मिक, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक समतेचा संदेश त्यांनी दिला. सर्वांगीण समतेचा त्यांनी पाया घातला. खऱ्या अर्थाने जोतीबा हे 'महात्मा' होते.

Scanned with ACE Scanner